Teachingninja.in

Latest Govt Job updates

Private Job updates

Free Mock tests available

Visit - teachingninja.in

# MPSC Stenographer

## Previous Year Paper

### 11 March 2018 (Marathi)

Teachingninja.in

उच्चश्रेणी लघुलेखक (मराठी), गट-ब (अराजपत्रित)
सामान्य प्रशासन विभाग चाळणी परीक्षा - 2018
परीक्षा दिनांक - 11 मार्च, 2018

**A** → संच क्रमांक

**2018** **D11**

प्रश्नपुस्तिका — प्रश्नपुस्तिका क्रमांक / BOOKLET NO. 103389

**चाळणी परीक्षा/SCREENING TEST** — एकूण प्रश्न : 100

वेळ : 1 ( एक ) तास — **मराठी भाषा व बुद्धिमापन चाचणी** — एकूण गुण : 100

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉल्पेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

↑ केंद्राची संकेताक्षरे — ↑ शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉल्पेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नांकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार पर्यायांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

**पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये**

SEAL

Teachingninja.in

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

1. पुढे काही वाक्प्रचार व त्याचा अर्थ दिलेला आहे, त्याआधारे योग्य जोड्या लावा -

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | ओनामा | (i) | गचांडी देणे |
| (b) | अर्धचंद्र | (ii) | शेवट |
| (c) | इतिश्री | (iii) | मोठे काम करणे |
| (d) | उजेड पाडणे | (iv) | प्रारंभ |

**पर्यायी उत्तरे :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (iii) | (ii) | (i) | (iv) |
| (2) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| (3) | (i) | (iii) | (iv) | (ii) |
| (4) | (iv) | (i) | (ii) | (iii) |

---

2. पुढीलपैकी कोणत्या शब्दांना संस्कृतमधील उपसर्ग आहेत ?

(1) अजाण, अडाणी, अनोळखी (2) दररोज, दरसाल, दरमजल

(3) अत्यंत, अतिरेक, अतिप्रसंग (4) अवजड, अवघड, अवदसा

---

3. पुढील वाक्यातील अधोरेखित उभयान्वयी अव्ययाचा प्रकार ओळखा –

'प्रेम केले <u>की</u> कविता सुचते'.

(1) परिणाम बोधक (2) संकेतदर्शक (3) उद्देशदर्शक (4) विकल्पबोधक

---

4. उत्कर्ष या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द कोणता ?

(1) चांगला (2) अपकर्ष (3) अपहार (4) अपकीर्ती

---

5. खालीलपैकी कोणत्या वाक्प्रचाराच्या संदर्भातील जोडी चुकीची आहे ते ओळखा ?

(1) पाणी पडणे — उत्साहभंग होणे (2) पाणी पाजणे — तहान शमवणे

(3) पाया घालणे — प्रारंभ करणे (4) पायमल्ली करणे — धुडकावणे

---

6. कोणत्या वाक्यातील क्रियापदाच्या रूपावरुन विधी म्हणजे कर्तव्य, शक्यता, योग्यता, इच्छा या गोष्टींची जाणीव होते ?

(1) संकेतार्थी (2) विध्यर्थी (3) स्वार्थी (4) आज्ञार्थी

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

7. शुद्ध शब्दयोगी अव्यये कोणती ते ओळखा ?

(1) पुढे, नंतर, वर
(2) अर्थी, निमित्त, साठी
(3) च, ही, ना, सुद्धा
(4) आतून, पासून, मधून

---

8. 'जगन्नाथ' या शब्दातील योग्य संधी विग्रह ओळखा –

(1) जग + नाथ (2) जग + न्नाथ (3) जगन् + नाथ (4) जगत् + नाथ

---

9. पुढीलपैकी कोणता शब्द अरबीतून मराठीत रूढ झाला आहे ?

(1) अत्तर (2) अब्रू (3) अक्का (4) अर्ज

---

10. नमस्कार या शब्दाला समानार्थी शब्द कोणता ?

(1) कोदंड (2) असूर (3) प्रणिपात (4) निर्मिक

---

11. 'तुला जसे वाटेल तसे वाग.' या वाक्यातील 'तुला जसे वाटेल' हे क्रियाविशेषणवाक्य कोणत्या क्रियाविशेषणाचे कार्य करते ?

(1) रीतिदर्शक (2) स्थलदर्शक (3) उद्देशदर्शक (4) संकेतदर्शक

---

12. सुलक्षणी या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द कोणता ?

(1) कुलक्षणी (2) कुरुपक्षणी (3) सुंदर (4) मोहक

---

13. 'अभंग पुस्तक वाचतो' या वाक्यातील प्रयोग ओळखा.

(1) कर्तरी (2) कर्मणी (3) भावे (4) संकीर्ण

---

14. पुढीलपैकी कोणते उदाहरण विसर्गसंधीचे **नाही** ?

(1) इतउत्तर, अतएव (2) नीरस, नीरव (3) दुर्जन, निरंतर (4) पुनर्जन्म, अंतरात्मा

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

15. 'शाब्बास' हे कोणत्या प्रकारचे अव्यय आहे ?

(1) शब्दयोगी (2) उभयान्वयी (3) केवलप्रयोगी (4) यापैकी एकही नाही

16. पुढीलपैकी देशी शब्द ओळखा –

(1) फणस (2) दादर (3) लुगडे (4) कामगार

17. पुढीलपैकी कानडीतून मराठीत आलेले शब्द कोणते ?

(1) भाई, दाम, करोड (2) बटाटा, कोबी, हापूस

(3) पेशवा, पोशाख, सामना (4) भाकरी, गाजर, विळी

18. 'आई रोज देवाला जाऊन येते' या वाक्यातील क्रियापद ओळखा ?

(1) आई (2) रोज (3) देवाला (4) येते

19. उपसर्ग म्हणजे –

(1) शब्दाच्या नंतर येणारी अक्षरे (2) शब्दाच्या आधी येणारी अक्षरे

(3) अधिविशेषणे (4) उपमान

20. पुढीलपैकी कोणते शब्द अनुकरणवाचक नाहीत ते सांगा ?

(1) किरकीर, बडबड, कडकडाट (2) गुटगुटीत, गडगडाट, खदखदून

(3) दंगामस्ती, धनदौलत, मानमरातब (4) लुटूलुटू, चुटचुट, वटवट

21. वाक्यातील कल्पना अधिक खुलवून दाखविण्यासाठी वाक्यात त्या भावनेचा उद्गार काढलेला असतो. अशा प्रकारच्या वाक्यांना ___________ म्हणतात.

(1) प्रश्नार्थी वाक्य (2) विधानार्थी वाक्य (3) उद्गारार्थी वाक्य (4) केवल वाक्य

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

22. 'उंबराचे फूल' या वाक्प्रचाराचा योग्य अर्थ ओळखा -

(1) कधीच न भेटणारी व्यक्ती (2) क्वचित भेटणारी व्यक्ती

(3) बोलावल्यावर भेटणारी व्यक्ती (4) दूरवर राहणारी व्यक्ती

23. खालीलपैकी व्याकरणदृष्ट्या बरोबर असलेला शब्द कोणता ? ते लिहा.

(1) अभिष्टचिंतन (2) आभिष्टचिंतन (3) अभीष्टचिंतन (4) अभिष्ठचिंतन

24. शब्दाच्या किंवा धातूच्या पुढे एक किंवा अधिक अक्षरे लावून साधित शब्द तयार होतात, अशा अक्षरांना ________ असे म्हणतात.

(1) शब्दसिद्धी (2) प्रत्यय (3) धातू (4) उपसर्ग

25. रिकामी जागा भरा -

'वाक्यातील क्रिया कोठे किंवा केव्हा घडली हे क्रियेचे स्थान किंवा काळ दर्शविणाऱ्या शब्दाच्या संबंधास ________ असे म्हणतात.

(1) अपादान (2) संप्रदान (3) संबोधन (4) अधिकरण

26. अ, इ, उ, ऋ, लृ हे कोणते स्वर आहेत ?

(a) तदुत्पन्न अथवा साधित स्वर (b) मूलस्वर (c) दीर्घ स्वर (d) संयुक्त स्वर

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (c) बरोबर (2) फक्त (b) बरोबर (3) फक्त (d) बरोबर (4) फक्त (a) बरोबर

27. 'एकाच आईच्या पोटी ज्यांचा जन्म झालेला आहे असे' — या शब्दसमूहासाठी पुढील योग्य पर्याय निवडा.

(1) सहोदर (2) मातृमुखी (3) मातृप्रेमी (4) मातुल

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

28. अनुज-अग्रज, ऐच्छिक-अपरिहार्य, कृतज्ञ-कृतघ्न तर शुद्धपक्ष या शब्दासाठी विरुद्धार्थी शब्द कोणता ?

(1) अशुद्धपक्ष (2) वद्यपक्ष (3) कृष्णपक्ष (4) शुक्लपक्ष

---

29. पुढील वाक्य होकारार्थी वाक्यात परिवर्तित करा –

'पाचशे रूपये ही काही लहान रक्कम नव्हे.'

(1) पाचशे रूपये ही देखील मोठी रक्कम आहे.

(2) पाचशे रूपयापेक्षा दुसरी मोठी रक्कम नाही.

(3) पाचशे रूपये ही लहान रक्कम आहे.

(4) वरीलपैकी एकही नाही.

---

30. योग्य पर्याय निवडा –

(a) अ-आ, इ-ई, उ-ऊ, हे सजातीय स्वर आहेत.

(b) अ-इ, अ-उ, इ-ए, हे विजातीय स्वर आहेत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) बरोबर आणि (b) चूक (2) (a) आणि (b) दोन्ही बरोबर

(3) (a) आणि (b) दोन्ही चूक (4) (b) बरोबर आणि (a) चूक

---

31. पुढील शब्दसमूहात न जुळणारा शब्द ओळखा –

(1) चांगुलपणा (2) सैन्य (3) शौर्य (4) विद्वत्ता

---

32. भलता सलता कोणी तरी या अर्थाचा शब्दसमूह कोणता ?

(1) उपटसुंभ (2) अष्टपैलू (3) अजागळ (4) अक्षरशत्रू

---

33. बिंदूच्या खणखणीत उच्चारास काय म्हणतात ?

(a) अनुनासिक (b) अनुस्वार (c) विसर्ग (d) स्वर

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) बरोबर बाकी सर्व चूक (2) फक्त (b) बरोबर बाकी सर्व चूक

(3) फक्त (d) बरोबर बाकी सर्व चूक (4) फक्त (c) बरोबर बाकी सर्व चूक

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

**34.** योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागी भरा -

'एकच व्यंजन दोनदा जोडले गेले तर त्यास ________ असे म्हणतात.

(1) द्वित (2) संयुक्त व्यंजन (3) जोड व्यंजन (4) जोडाक्षर

---

**35.** अनुक्रमाने पुढील शब्दांचे लिंग ओळखा -

पगडी, पागोटे, रूमाल

(1) पुल्लिंगी, स्त्रीलिंगी, नपुंसकलिंगी (2) पुल्लिंगी, नपुंसकलिंगी, स्त्रीलिंगी

(3) स्त्रीलिंगी, नपुंसकलिंगी, पुल्लिंगी (4) नपुंसकलिंगी, पुल्लिंगी, स्त्रीलिंगी

---

**36.** 'दोघे, उभयता, चाऱ्ही, पाची' ही विशेषणे विशेषणाच्या कोणत्या पोटप्रकारातील आहेत ?

(1) साकल्यवाचक (2) पूर्णांकवाचक (3) अपूर्णांकवाचक (4) क्रमवाचक

---

**37.** खालीलपैकी महाप्राण व्यंजन कोणते ते लिहा.

(1) ळ् (2) ह् (3) क्ष् (4) ज्ञ्

---

**38.** पुढील शब्दसमूहास योग्य शब्द सूचवा -

'घरादारास व देशास पारखा झालेला'.

(1) दूरस्थ (2) निराधार (3) दरवेशी (4) निर्वासित

---

**39.** 'सांगी तर सांगी म्हणे वडाला वांगी' या म्हणीसाठी समानार्थी म्हण सांगा.

(1) वडाची साल पिंपळाला. (2) बोलाचीच कढी बोलाचाच भात.

(3) बारा हात काकडी तेरा हात बी. (4) गोफण इकडे तर गोटा तिकडे.

---

**40.** अगं, अरे, ऐ, अहो ही कोणत्या केवलप्रयोगी अव्ययाची उदाहरणे आहेत ?

(1) मौनदर्शक (2) संबोधनदर्शक (3) संमतीदर्शक (4) शोकदर्शक

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

**पुढील उतारा वाचून खालील प्रश्न क्रमांक 41 ते 45 ची योग्य उत्तरे लिहा.**

संतसाहित्य हे एक प्रकारे विद्रोही साहित्य आहे; कर्मकांड आणि विषमता यांनी ग्रासलेल्या जडमूढ धर्मजीवनाला धक्का देणारे साहित्य आहे; सामाजिक विषमतेचा जाच तीव्र शब्दांत व्यक्त करणारे साहित्य आहे आणि ते धर्मशुद्धीच्या आंदोलनाशी बांधलेले साहित्य आहे, याची आपणांस कल्पना आहे. त्याचमुळे ते लोकसाहित्याशी अनुबंध राखणारे साहित्य आहे. संतांनी आपल्या प्रचाराचे माध्यम म्हणून लोकछंदांचा, लोकगीतसरणीचा, लोकनाट्यांचा स्वीकार अगदी नि:शंक मनाने केला; या लोकमाध्यमांची बलस्थाने, प्रभावपरिमाणे त्यांनी हेरली; त्यांत आपला आशय अशा कुशलतेने भरला की, त्यांची मूळची लौकिक प्रकृती ढळू न देता त्यांच्याविषयीच्या आकर्षणाने लोकमानस आपल्या बोलण्याकडे आकर्षित केले. संतांची ही लौकिक सरणीची रचना कीर्तन आणि तमाशा या दोन्ही लोकमाध्यमांना महत्त्व देणारी आहे, या दोहींच्या प्रभावाचे भान राखणारी रचना आहे.

एकोणिसाव्या शतकात इंग्रजी विद्येच्या संपर्कातून आणि इंग्रजी राजवटीने लाभलेल्या दृष्टितून जे नवप्रबोधन सुरू झाले, त्याच्या नेत्यांनीही लोकमाध्यमांच्या सामर्थ्याकडे दुर्लक्ष केले नाही. प्रबोधनयुगात ज्या अनेक चळवळी झाल्या, त्यांत कीर्तन आणि शाहिरी या दोहोंनाही महत्त्व होते. परमहंस सभेतून प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे जे दोन प्रवाह उगम पावले, त्यांपैकी एक ब्रह्म समाज आणि दुसरा सत्यशोधक समाज. या दोन्ही चळवळीत कीर्तन माध्यमाचा प्रचारासाठी विपुल उपयोग केला गेला आहे. वामन आबाजी मोडक, रा.गो. भांडारकर, महर्षी शिंदे या आणि इतर अनेक ब्रह्मसमाजीय नेत्यांनी अत्यंत गांभीर्याने, निष्ठेने आणि अभ्यासपूर्वक कीर्तने केली आहेत; त्याचप्रमाणे सत्यशोधकांनीही आपल्या विचारप्रचारासाठी कीर्तने केली आहेत. ब्रह्मसमाजीय कीर्तनकार हे उच्च वर्णातून आलेले, उच्चशिक्षित नेते असल्यामुळे त्यांपैकी अनेकांची कीर्तने लिखित स्वरूपात उपलब्ध आहेत; तसेच त्यांच्या कीर्तनांची वर्णने व तपशीलवार नोंदी उपलब्ध आहेत. परंतु सत्यशोधक कीर्तनकार हे शिक्षणपरंपरा नसलेल्या घराण्यांतून उदय पावलेले असल्यामुळे आणि त्यांचे श्रोते हेही अशिक्षित असल्यामुळे त्यांच्या कीर्तनांची कल्पना आपणांस नीटशी येऊ शकत नाही. परंतु आपणांस ब्रह्मसमाजीय कीर्तनकार आणि सत्यशोधक कीर्तनकार यांच्या कीर्तनसरणीतील भेद काय असू शकेल, याची काही अस्फुट कल्पना करता येते. ज्याप्रमाणे संतसाहित्याचे **'अभिजन'** पुरस्कर्ते नारदीय कीर्तन करतात आणि त्यांचे 'बहुजन' पुरस्कर्ते वारकरी कीर्तन करतात, त्याचप्रमाणे ब्रह्मसमाजीय कीर्तनकारांची कीर्तने ही नारदीय सरणीची होती आणि सत्यशोधक कीर्तनकरांची कीर्तने ही वारकरी सरणीची होती, असे आपण म्हणू शकतो. पैकी ब्रह्मसमाजीय कीर्तने ही नारदीय सरणीची असल्याचे उपलब्ध कीर्तनांवरून सिद्ध होते, तर सत्यशोधक कीर्तने ही वारकरी सरणीचीच असावीत, असे अनुमानिता येते. मला तर गाडगेबाबा हे सत्यशोधकीय कीर्तनपरंपरेचे परम आदर्श आहेत, असे वाटते.

---

**41.** प्रबोधन युगात कशाला जास्त महत्त्व होते ?

(1) इंग्रजी विद्या (2) शिक्षण परंपरा (3) कीर्तन आणि शाहिरी (4) धर्मशुद्धी

---

**42.** संतांनी आपल्या प्रचाराचे माध्यम म्हणून कशाचा स्वीकार केला **नाही** ?

(1) तमाशा (2) लोकछंद (3) लोकगीतसरणी (4) लोकनाट्य

---

**43.** या उताऱ्याला नेमके शीर्षक द्या.

(1) नवप्रबोधन आणि लोकमाध्यमे (2) कीर्तन परंपरा व इंग्रजी विद्या

(3) लोकसाहित्याचे स्वरूप (4) कीर्तनकाराचे कार्य

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

**44.** कोणाची कीर्तने लिखित स्वरूपात उपलब्ध आहेत ?

(1) सत्यशोधक कीर्तनकार (2) संत कीर्तनकार

(3) पारंपरिक कीर्तनकार (4) ब्रह्मसमाजीय कीर्तनकार

---

**45.** कर्मकांड आणि विषमता यांनी ग्रासलेल्या जडमूढ धर्मजीवनाला धक्का देणारे साहित्य कोणते ?

(1) लोकसाहित्य (2) विज्ञानवादी साहित्य

(3) संतसाहित्य (4) इंग्रजी साहित्य

---

**पुढील उतारा वाचून खालील प्रश्न क्रमांक 46 ते 50 या प्रश्नांची उत्तरे द्या.**

भारतीय संस्कृतींत अंधश्रद्धेला स्थान नाहीं. विचाराचा महिमा सर्वत्र गाइलेला दिसून येईल. भारतीय संस्कृतिचा वेद हा पाया मानला जातो. परंतु वेद म्हणजे काय ? वेद या शब्दाचा अर्थ ज्ञान असा आहे. ज्ञान हा भारतीय संस्कृतिचा आधार आहे. ज्ञानावर उभारलेली ही भव्य संस्कृती आहे.

वेद किती आहेत ? वेद अनंत आहेत. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद एवढेच वेद नाहींत. भारतीय संस्कृतिचा एकच ऋषि नाहीं, एकच पैगंबर नाहीं, एकच वेद नाहीं, भारतीय संस्कृति गगनाप्रमाणें विशाल व सागराप्रमाणें अपार आहे.

जीवनाला सुंदर करणारा प्रत्येक विचार म्हणजे वेद आहे. आपले आयुष्य आनंदी व उत्साही कसे राहील हे आयुर्वेद सांगेल. समाजाचे रक्षण कसे करावें, तें धनुर्वेद सांगेल, समाजाची करमणूक कशी करावी, समाजाला दु:खाचा विसर कसा पडावा, तें गांधर्ववेद सांगेल. हे सारे वेदच आहेत.

काल अनंत आहे व ज्ञान अनंत आहे. नवीन नवीन ज्ञान उदयास येईल व भारतीय संस्कृती सर्वांआधी त्या ज्ञानाचा सत्कार करावयास उभी राहील. भारतीय संस्कृतिला ज्ञानाहून दुसरें कांहींहि पवित्र वाटत नाहीं, ज्ञानोपासकांबद्दल भारतीय संस्कृतिला नितान्त आदर आहे.

भारतीय संस्कृती एकाच काळी सारे ऋषि झाले असें कधींहि मानणार नाहीं. असें म्हणणें अहंकार आहे. तो परमेश्वराचा अपमान आहे. सारें ज्ञान जर खलास झालें असेल, तर सृष्टीच्या अस्तित्त्वाची कांहीं जरूरच नाहीं. कणसें आलीं कीं ज्वारी कापून टाकावयाची, एवढेंच उरतें. त्याप्रमाणे शोधावयास कांहीं जर शिल्लकच नसेल तर मानवाच्या उत्पत्तीला कांहीं अर्थ उरत नाहीं.

नवीन नवीन विचार उत्पन्न होतात, नवीन नवीन ज्ञान आपणांस मिळतें. युरेनस, व नेपच्यून हे पूर्वी दिसत नव्हतें, ते आतां दिसू लागले. खगोलांत ज्याप्रमाणें नवीन नवीन तारे दिसतात, त्याप्रमाणें जीवनाच्या शास्त्रांतहि नवीन नवीन विचार उत्पन्न होत असतात.

खरें पाहिलें तर इतर सर्व शास्त्रांच्या मानानें हें जीवनशास्त्र फारच प्रयोगावस्थेत आहें असें म्हणावे लागेल. ह्या जीवनाच्या शास्त्रांत अद्याप कांहींहि ठरलें नाहीं. भूमितीमध्यें स्वयंसिद्ध, शंकातीत, संशयातीत अशीं कांहीं तत्त्वें आहेत. गणितशास्त्रात पृथ्वीच्या पाठीवर कोठेंहि गेलें तरी दोन नि दोन चार यात फरक होणार नाहीं. परंतु जीवनाच्या शास्त्रांत असें एकहि तत्त्व नि:शंकपणें अपवादरहित असे मांडतां येणार नाहीं. सत्य चांगलें कीं वाईट, अहिंसा योग्य का अयोग्य, ब्रह्मचर्य असावें कां नसावें, यांची निश्चित उत्तरें अद्याप मानवी मनास देतां येणार नाहींत.

असें असल्यामुळें भारतीय संस्कृती कशाचा आग्रह धरीत नाहीं. 'बुद्ध: फलमनाग्रह:' कोणत्याहि तत्त्वाचा आग्रह बुद्धिमान मनुष्य धरणार नाहीं. श्रीकृष्णांनी शेवटी अर्जुनाला "यथेच्छसि तथा कुरु" असें सांगून त्याच्या बुद्धीला महत्त्व दिलें. वेदधर्म म्हणजें विचाराप्रमाणें वागणें, बुद्धी सांगेल त्याप्रमाणें वागणें, "अंतरिचा ज्ञानदिवा मालवू नको रे" असें भारतीय संस्कृती सांगत आहे.

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

**46.** जीवनाच्या शास्त्रातील तत्त्वांचे वैशिष्ट्य असे की ती ________.

(1) शंकातीत, संशयातीत असतात (2) अपवादरहित असतात

(3) अपवादरहित नसतात (4) स्वयंसिद्ध असतात

---

**47.** भारतीय संस्कृतिचा मूलाधार कोणता आहे ?

(1) वेद (2) जीवनाचे शास्त्र (3) ज्ञान (4) सत्य

---

**48.** सारे ज्ञान नष्ट झाले तर कशाची आवश्यकता राहाणार **नाही** ?

(1) वेदांची (2) मानवाच्या उत्पत्तीची

(3) सृष्टीच्या अस्तित्वाची (4) ऋषीमुनींची

---

**49.** भारतीय संस्कृती कशाप्रमाणे विशाल आहे ?

(1) सागराप्रमाणे (2) गगनाप्रमाणे (3) गगन व सागराप्रमाणे (4) वेदांप्रमाणे

---

**50.** भारतीय संस्कृती कोणता संदेश देते ?

(1) बुद्ध फलमनाग्रह (2) यथेच्छसि तथा कुरु

(3) अंतरिंचा ज्ञानदिवा मालवू नको रे (4) ब्रह्मचर्य असावे

---

**51.** खालील अंकमालिकेतील प्रश्नचिन्ह असलेल्या मोकळ्या जागेत बिनचूक अंक दिलेल्या पर्यायातून निवडा.

4, 9, 16, 25, 36, 49, __?__

(1) 81 (2) 25 (3) 64 (4) 100

---

**52.** पुढील समीकरण सोडवा –

(523 चे 755%) ÷ 777 = ?

(1) 5.08 (2) 12.08 (3) 19.08 (4) 26.08

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

53. एका सांकेतिक भाषेत SUNDAY हा शब्द USNDYA असा लिहिल्यास त्याच सांकेतिक भाषेत MONDAY हा शब्द कसा लिहितील ?

(1) OMDNYA (2) OMNDAY (3) MODNYA (4) OMNDYA

---

54. राजाभाऊ हे त्यांची पत्नी उषापेक्षा 6 वर्षांनी मोठे आहेत त्या दोघांच्या वयाची बेरीज करुन ती दुप्पट केली असता 108 वर्ष येते तर त्या दोघांचे आजचे वय काय ?

(1) 36 आणि 30 (2) 44 आणि 38 (3) 30 आणि 24 (4) 30 आणि 22

---

55. जर, $6 \times 5 = 24$, $5 \times 4 = 15$ आणि $7 \times 8 = 49$ तर, $8 \times 4 =$ किती ?

(1) 64 (2) 24 (3) 28 (4) 36

---

56. दुपारी 1.25 वाजल्यापासून सायंकाळी 5.25 पर्यंत मिनिटकाटा तास काट्याला किती वेळा ओलांडून जाईल ?

(1) 2 (2) 3 (3) 4 (4) 5

---


57. 5 तास 40 मिनिटांच्या 30% म्हणजे किती वेळ ?

(1) 1 तास 2 मिनिट (2) 1 तास 42 मिनिट

(3) 1 तास 6 मिनिट (4) 2 तास 42 मिनिट

---

प्रश्न क्रमांक **58** व **59** ची उत्तरे पुढील आकृतीवरून लिहा.




शेजारील आकृतीतील वर्तुळ रोजगार असलेल्या लोकांचे आहे. Δ त कष्टाळू लोक दाखविलेले आहेत □ प्रामाणिक लोकांचा तर आयतामध्ये स्त्रीया दाखविलेल्या आहेत आकृतीच्या आधारे प्रश्नाचे उत्तर लिहा.

---

58. कष्टाळू व रोजगार असणाऱ्या स्त्रीया दर्शविणारे आकडे ________ आहेत.

(1) 3 व 4 (2) 2 व 3 (3) 7 व 5 (4) कोणतेच नाही

---

59. प्रामाणिक व रोजगार असणारे लोक कोणते ?


(1) 9, 8, 7 (2) 7, 5, 2 (3) 1, 5, 7 (4) 2, 5, 1

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

प्रश्न क्रमांक 60 व 61 ची उत्तरे खालील आलेखावरून लिहा.




**60.** अ, ब, क, ड गावातील एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात साक्षरांचे प्रमाण किती ?

(1) 2 : 1 (2) 3 : 1 (3) 4 : 1 (4) 5 : 1

**61.** अ, ब, क, ड या गावातील एकूण लोकसंख्या किती ?

(1) 4459 (2) 4546 (3) 4458 (4) 4372

**62.** 16 मुलांच्या वयाची सरासरी 16 वर्षे असून त्यांच्या शिक्षकाचे वय त्यात मिळविल्यास सरासरी 17 येते तर शिक्षकाचे वय किती वर्ष असेल ?

(1) 30 वर्ष (2) 32 वर्ष (3) 33 वर्ष (4) 34 वर्ष

**63.** पुढील समीकरण सोडवा -

(1254 चे 23.6%) – (834 चे 16.6%) = ?


(1) 159.5 (2) 157.5 (3) 155.5 (4) 153.5

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in




**64.** प्रश्न चिन्हाच्या जागी कोणती संख्या असेल ?




(1) 125 (2) 124 (3) 100 (4) 126

---

**65.** मिनी तिला मिळणाऱ्या शिष्यवृत्तीतील बरीच रक्कम अन्नासाठी आणि काही रक्कम प्रवासासाठी खर्च करते. उरलेली रक्कम ती अडी-अडचणींसाठी व पुस्तकांसाठी राखून ठेवते. अन्नासाठी खर्च होणाऱ्या रकमेतील $\frac{1}{8}$ रक्कम ती आपल्या गरजू मैत्रिणीला देते. ही सर्व माहिती निर्देशित करणारी वेन आकृती निवडा.

(1)  (2)  (3)  (4) 

---

**66.** जर दोन प्रणालींमधील सहसंबंध खालील चिन्हानी दर्शविला आहे. तर असाच सहसंबंध तिसऱ्या व चौथ्या प्रणालीमध्ये दर्शवा -

जर ☆ □ ▽ Z σ ϕ ⟷ Z □ ϕ ☆ ▽ σ

तर α □ ⊙ 卐 Σ 8 ⟷ ?

(1) 卐 α ⊙ □ Σ 8 (2) 8 α ⊙ □ Σ 卐

(3) 卐 □ 8 α ⊙ Σ (4) ⊙ 卐 α □ Σ 8

---

**67.** 30 सेकंदाचे 4 मिनिटाशी गुणोत्तर किती ?

(1) 1 : 8 (2) 15 : 2 (3) 2 : 15 (4) 8 : 1

---

**68.** पुढील वर्णमालिका पूर्ण करा.

BAT, FAT, JAT, ...........

(1) CAT (2) RAT (3) HAT (4) NAT

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK


Teachingninja.in




**69.** सॅम नऊ दिवसांपूर्वी आपल्या आईला भेटायला गेला होता. तो फक्त सोमवारीच आईला भेटू शकतो कारण त्या दिवशी भारनियमनामुळे त्याला छपाई यंत्रणा वापरता येत नाही म्हणून त्याचा छापखाना बंद असतो. तर आज कोणता दिवस आहे ?

(1) मंगळवार (2) बुधवार (3) गुरुवार (4) शुक्रवार

---

**70.** पुढील चौकटीत दिलेल्या प्रतिमांतील तर्कसंगतीचा शोध घेऊन रिकाम्या चौकटीसाठी उचित पर्याय निवडा.



(1)  (2)  (3)  (4) 

---

**71.** पुढे एक विधान व त्यापुढे (a) व (b) ही त्या विधानात अंतर्निहित असण्याची शक्यता असलेली गृहीतके दिली आहेत. त्यांच्या संदर्भात दिलेल्या पर्यायी निर्णयांतून जास्तीत जास्त तर्कसंगत निर्णय निवडा.

**विधान :** निवडणुकीच्या निमित्ताने दारोदार प्रचार करणारा कार्यकर्ता म्हणाला, ''xxx यांना निवडून दिल्यास ते गुणवत्तापूर्ण कारभार करून आपल्याला चांगले दिवस दाखवू शकतील.''

**गृहीतके :** (a) सध्याच्या कारभारामुळे लोकांना वाईट दिवस आलेले आहेत.

(b) या नेत्यात अशी क्षमता आहे की ज्यामुळे ते आपल्या मतदारांना हव्या त्या सुविधा विनासायास व विनामूल्य देऊ शकतो.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) हे गृहीतक अंतर्निहित आहे.

(2) फक्त (b) हे गृहीतक अंतर्निहित आहे.

(3) (a) व (b) ही दोन्हीही गृहीतके अंतर्निहित आहेत.

(4) (a) व (b) यापैकी कोणतेही गृहीतके अंतर्निहित नाही.

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

72. भारतात लाकूड सामान निर्मितीचा खर्च युरोपातील कोणत्याही देशाच्या तुलनेत 25% कमी आहे. वहातुकीचा खर्च आणि आयात कर भरला तरीही तेथे लाकूड सामान आयात करणे स्वस्त पडते.

पुढीलपैकी कोणत्या प्रतिपादनाला वरील माहिती भक्कम पाठबळ देते ?

(1) युरोपच्या तुलनेत भारतातील मजुरीचा दर 25% कमी आहे.


(2) भारतातून युरोपीय देशात आयात केलेल्या लाकूड सामानावरील आयात कर हा युरोपीय देशात ते निर्माण करायला लागणाऱ्या किमतीपेक्षा 25% कमी आहे.

(3) भारतातून युरोपीय देशात लाकूड सामान वाहून नेण्याचा खर्च हा भारतात ते निर्माण करायला लागणाऱ्या खर्चाच्या 25% अधिक आहे.

(4) युरोपीय देशात लाकूड सामान निर्माण करायला लागणाऱ्या वेळाच्या तुलनेत भारतात ते निर्माण करायला 25% वेळ कमी लागतो.

---

73. खालील आकृतीत चौरस व चौकोनाची एकूण बेरीज किती आहे ?



(1) 200 (2) 210 (3) 220 (4) 190

---

74. पहिल्या दोन संख्यातील संबंध शोधून प्रश्नचिन्हाच्या जागी कोणती संख्या येईल ती पर्यायातून निवडा.

19 : 420 : : 21 : __?__

(1) 484 (2) 448 (3) 508 (4) 506

---

75. मिली, दीप, डेव्हिड आणि पिनी हे विद्यार्थी चौरसाकार पृष्ठ असलेल्या टेबलाच्या प्रत्येक बाजूला एकजण याप्रमाणे उभे आहेत. डेव्हिड आणि दीप एकमेकांसमोर उभे आहेत. पिनीचे तोंड दक्षिणेला आहे व डेव्हिड तिच्या डाव्या हाताला नाही. टेबलाच्या पृष्ठभागावर मधोमध भौगोलिक दिशांशी जुळवलेला भारताचा नकाशा पसरलेला आहे. दीपने काही कारणाने हा नकाशा स्वत:च्या संदर्भात प्रतिघटिवत दिशेने काटकोनातून फिरवला. मिली आणि पिनी या दोघींनीही एकमेकांच्या जागा बदलल्या तर आता मिलीच्या बाजूला असलेला नकाशातील भाग निवडा.

(1) अरबी समुद्र (2) बंगालचा उपसागर


(3) हिन्दी महासागर (4) हिमालयाच्या रांगा

---


**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in


76. सोबतच्या (क्ष) प्रतिमेचे निरीक्षण करून ती पुढे दिलेल्या कोणत्या संचाचा घटक आहे याचा निर्णय निवडा.


क्ष

संच अ



संच ब



**पर्यायी उत्तरे :**

(1) ''क्ष'' ही प्रतिमा फक्त अ या संचाचा घटक आहे.

(2) ''क्ष'' ही प्रतिमा फक्त ब या संचाचा घटक आहे.

(3) ''क्ष'' ही प्रतिमा दिलेल्या कोणत्याही संचाचा घटक नाही.

(4) ''क्ष'' ही प्रतिमा दोन्ही संचांचा घटक आहे.

---

77. मिनू, पमी, जो, धनू, कावस, फणी आणि फिझा हे सात विद्यार्थी अरुणोदय अनुभवण्यासाठी एका ओळीत बसले आहते. मात्र त्यांचा क्रम यादीप्रमाणे असेलच असे नाही. त्यांच्याबाबत दिलेली माहिती वाचून संबंधित प्रश्नाचे उत्तर निवडा.

- फणीच्या शेजारी उजव्या हाताला फिझा बसली आहे.
- फणी हा जोच्या उजवीकडे चौथा आहे.
- मिनू आणि धनू यांच्यामध्ये पमी बसली आहे.
- धनूच्या डावीकडून तिसरा असलेला जो ओळीच्या शेवटी आहे.

तर फिझा कोणाच्या डावीकडे बसलेली आहे ?

(1) कावस (2) धनू (3) मिनू (4) पमी

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

78. प्रश्न आकृतीतील आकृती क्रमांक 1 आणि 2 मध्ये जो संबंध आहे, तोच आकृती 3 आणि 4 मध्ये आहे. प्रश्नार्थक चिन्हाच्या ठिकाणी योग्य ती आकृती उत्तर आकृतीतून निवडा.

प्रश्न आकृती

(1)

| | | |
|---|---|---|
| S | C | T |
| ○ | | X |
| □ | △ | ✡ |

(2)

| | | |
|---|---|---|
| △ | O | □ |
| X | | ✡ |
| C | T | S |

: :

(3)

| |
|---|
| ? |

(4)

| | | |
|---|---|---|
| P | O | ☾ |
| ⇑ | | = |
| ↑ | ▯ | Y |

उत्तर आकृत्या

(a)

| | | |
|---|---|---|
| ▯ | ↑ | P |
| ○ | | ⇑ |
| ☾ | Y | = |

(b)

| | | |
|---|---|---|
| Y | ▯ | ↑ |
| ○ | | ⇑ |
| ☾ | P | = |

(c)

| | | |
|---|---|---|
| Y | ↑ | ▯ |
| ○ | | ⇑ |
| P | ☾ | = |

(d)

| | | |
|---|---|---|
| Y | ↑ | ▯ |
| ○ | | ⇑ |
| ☾ | P | = |

(1) (a) (2) (b) (3) (c) (4) (d)

---

79. खाली गहाळ झालेली अक्षरे योग्य क्रमाने दिलेली आहेत. योग्य पर्याय निवडून अचूक उत्तर शोधा

ab – de – – bcdaa – – – aaab

(1) cabaca (2) bacada (3) abcdeb (4) caabca

---

80. फार पूर्वीपासून लोक दीर्घ पल्ल्याच्या प्रवासाला जाताना बिब्बा, लिंबू आणि मिरची या वस्तू एकत्र बांधून त्या चटकन हाताला लागतील अशा पद्धतीने वाहनाला टांगत. यामुळे त्यांचा उपयोग वेळ पडल्यास प्राथमिक उपचारांसाठी करणे सहज शक्य होई. म्हणूनच परंपरा म्हणून जर लोक या वस्तू वाहनाला टांगत असतील तर ते एक चांगली परंपरा जपत आहेत असे म्हणायला हवे.

पुढीलपैकी कोणते विधान वरील निष्कर्ष दुबळा ठरवते ?

(1) वाहनांना या वस्तू टांगण्याच्या परंपरेमुळे अनेक लोकांना व्यवसाय उपलब्ध होतात.

(2) स्वत:च्या वाहनांना या वस्तू नियमित टांगणाऱ्या विविध ठिकाणच्या 500 व्यक्तिंना त्यांचे औषधी उपयोग माहीत नव्हते.

(3) ही परंपरा उपयुक्त असल्याने परिवहन खात्याने या वस्तू वाहनांना टांगणे अनिवार्य करायला हवे.

(4) लोक केवळ श्रद्धेपोटी या वस्तू वाहनांना टांगणार असतील तर सर्वांनी या श्रद्धेचा आदर करायला हवा.

---

81. "अ" ही "ब" ची पत्नी असून ती "ड" ची आई आहे. "क" ही "ब" ची मुलगी आहे. "इ" हा "क" चा पती असून "ड" ही "फ" ची पत्नी आहे. तर "इ" चे "फ" शी नाते काय ?

(1) साडू (2) मेहुणा (3) जावई (4) त्यांचे काही नाते असणे शक्य नाही

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

82. वर्गातील $\frac{9}{10}$ मूले वार्षिक परिक्षेत पास झाली व फक्त 4 मूले नापास झाली तर वर्गात एकूण __________ मूले होती.

(1) 25 (2) 40 (3) 32 (4) 35

---

83. परिच्छेदाच्या आधारे प्रश्नाचे उत्तर निवडा –

महागाई अवरुद्धता ही अशी परिस्थिती आहे की ज्यात देशाच्या चलनाचा दर खाली जातो आणि बेकारीचा दर हळूहळू उंचावत जातो. या परिस्थितीत जर महागाईचा दर कमी करण्यासाठी कृती करण्याचा निर्णय घेतला तर बेकारीचा प्रश्न जटील होतो. म्हणूनच सार्वजनिक धोरण आखण्याच्या दृष्टीने ही परिस्थिती म्हणजे कठीण समस्या असते.

कोणती परिस्थिती महागाई अवरुद्धता ठरते ?

(1) वाढती महागाई; वाढती बेकारी (2) घटती महागाई; घटती बेकारी

(3) वाढती बेकारी; घटती महागाई (4) वाढती महागाई; घटती बेकारी

---

84. एका वसाहतीतील काही सदस्य मिळून ओल्या कचऱ्यापासून गांडुळखत बनवतात. एका घरातील असल्यामुळे मुन्नी व महेश यांच्यापैकी कोणीतरी एकच जण एक वेळी तेथे असतो. जर मुन्नी तेथे नसेल तर अली किंवा जॉनी यांच्यापैकी कोणीतरी मल्लूकडे मदत मागतात. जर अली किंवा जॉनी यांच्यापैकी कोणीतरी मल्लूकडे मदत मागितली तर आणि ज़र मुन्नी तेथे उपस्थित नसेल तर मल्लू त्यांना मदत करतो. जर अली किंवा जॉनीने मदत मागितली आणि मुन्नी तेथे असेल तर मात्र मल्लू त्यांच्या मागणीला दाद देत नाही.

जर महेश तेथे असेल तर वरील माहितीच्या आधारे पुढीलपैकी कोणते विधान खात्रीने **सत्य** आहे ?

(1) अली मल्लूकडे मदत मागेल. (2) जॉनी मल्लूकडे मदत मागेल.

(3) मुन्नी तेथे नसणार. (4) मल्लू महेशला मदत करणार.

---

85. देशाच्या पूर्व, उत्तर, दक्षिण व पश्चिम भागातून खेळाडू शिबिरात दाखल झाले आहेत. यातील 20 टक्के खेळाडू पश्चिम भागातील आणि याच्या निम्मे खेळाडू उत्तर भागातील आहेत आणि दोन विसांश खेळाडू दक्षिण भागातील आहेत. तर यातील किती भाग खेळाडू उत्तर, पश्चिम वा दक्षिण भागातील नाहीत ?

(1) 13/20 (2) 12/20 (3) 8/20 (4) 12/17

---

86. CLAIM : DNDMR : : CHARGE : __?__

(1) DJDWLL (2) DJDVLK (3) DJCVMK (4) DIDWKL

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

87. एक रस्ता बांधून पूर्ण करण्यास काही कामगारांना 20 दिवस लागतात, 15 दिवसात त्यांच्याकडून कामाचा किती भाग पूर्ण होईल ?

(1) $\frac{2}{4}$ (2) $\frac{2}{3}$ (3) $\frac{3}{4}$ (4) $\frac{4}{5}$

---

88. पुढे एक विधान व त्यापुढे (a) व (b) ही त्या विधानात अंतर्निहित असण्याची शक्यता असलेली गृहीतके दिली आहेत. त्यांच्या संदर्भात दिलेल्या पर्यायी निर्णयांतून जास्तीत जास्त तर्कसंगत पर्याय निवडा.

**विधान :** निवडणुकीच्या निमित्ताने दूरभाष यंत्रणा वापरून मतदारांशी वैयक्तिक संपर्क साधणारे, नव्या पक्षाचे विनामूल्य काम करणारे कार्यकर्ते सांगतात;

"xxx पक्षाला निवडून दिले तर सातत्याने भ्रष्टाचार विरोधात आंदोलन करणारा हा पक्ष तुम्हाला गुणवत्तापूर्ण कारभाराचे प्रात्याक्षिक दाखवू शकेल."

**गृहीतके :** (a) सध्याचा कारभार भ्रष्टाचाराने बरबटलेला आहे.

(b) भ्रष्टाचारयुक्त व्यवस्था मोडीत काढून तेथे भ्रष्टाचारमुक्त व्यवस्था प्रस्थापित करणे सहज शक्य आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) व (b) दोन्हीही अंतर्निहित आहेत. (2) फक्त (a) अंतर्निहित आहे.

(3) फक्त (b) अंतर्निहित आहे. (4) (a) व (b) दोन्हीही अंतर्निहित नाहीत.

---

89. आंबा, चिंच, जांभूळ, चिकू, पेरू आणि सिताफळ अशी प्रत्येक ओळीत 3 याप्रमाणे 6 झाडे कार्यालयाच्या आवारात समोरासमोर आहेत. पेरूचे झाड ओळीच्या शेवटी नाही. जांभूळ व चिंच यांच्या दरम्यान एक झाड आहे. चिकूचे झाड पेरूच्या झाडाच्या शेजारी आहे. चिकू व चिंच कर्णरेषेत समोरासमोर आहेत. सिताफळाचे झाड त्या ओळीत जांभळाच्या शेजारी आहे. तर भिन्न ओळीतील कोणते झाड लंबरेषेत पेरूच्या समोर आहे ?

(1) आंब्याच्या झाडाबाबत माहिती मिळाल्याखेरीज उत्तर निश्चित करणे शक्य नाही.

(2) आंबा

(3) चिकू

(4) सिताफळ

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

**90.** दिलेल्या माहितीच्या आधारे प्रश्नाचे उत्तर निवडा -

आवर्त सारणीच्या सतराव्या गटात समाविष्ट असलेल्या मूलद्रव्यांची ओळख दुर्मिळ मूलद्रव्ये अशी असली तरी प्रत्यक्षात पृथ्वीच्या बाह्यकवचात ती विपुल प्रमाणात आहेत मात्र एकाच ठिकाणी त्यांचा साठा आढळत नसल्याने त्याचे निष्कर्षण करणे आर्थिक दृष्ट्या फायदेशीर नसते त्यामुळे त्यांना दुर्मिळ मूलद्रव्ये म्हटले जाते. आतापर्यंत जगाला लागणाऱ्या दुर्मिळ मूलद्रव्यांचा 90% पुरवठा चीनकडून होत होता. चीन हळूहळू या दुर्मिळ मूलद्रव्यांच्या पुरवठ्याबाबत हात आखडता घेत आहे. पर्यावरण सुरक्षा, साठ्यांचा ऱ्हास आणि औद्योगिक नियमावल्या यामुळे येत्या काही वर्षात जगाला कदाचित दुर्मिळ मूलद्रव्यांचा तुटवडा पडेल.

पुढीलपैकी कोणत्या कारणाने/कारणांमुळे चीनकडून होणारा पुरवठा कमी झालेला नाही ?

(1) चीन स्वत:च मोठ्या प्रमाणात दुर्मिळ मूलद्रव्यांचा उपयोग करत आहे.
(2) चीनमधील दुर्मिळ मूलद्रव्य खनिजांचे साठे संपत आले आहेत.
(3) दुर्मिळ मूलद्रव्यांच्या निष्कर्षणामुळे पर्यावरणाच्या चिरस्थायित्वाला धोका पोहोचत आहे.
(4) उद्योगातील दुर्मिळ मूलद्रव्यांच्या वापरावरील नियंत्रणामुळे त्यांचा उपयोग करण्यावर बंधने आली आहेत.

---

**91.** जर RT = −2, TG = 13 तर IY = __?__

(1) −12 (2) 16 (3) 12 (4) −16

---

**92.** ''स्पर्धा'' या घटनेसाठी आवश्यक घटक निवडा.

(1) परीक्षक (2) स्पर्धक (3) प्रेक्षक (4) पारितोषिक

---

**93.** पहिल्या दोन संख्यातील संबंध शोधून प्रश्नचिन्हाच्या जागी कोणती संख्या येईल तो पर्याय निवडा.

15 : 228 : : 25 : __?__

(1) 635 (2) 525 (3) 451 (4) 628

---

**94.** पुढे दिलेली विधाने सत्य मानून (a) व (b) या निष्कर्षांबाबत निर्णय घेणारा पर्याय निवडा.

**विधाने :** काही उंदीर शहामृग आहेत. सर्व शहामृग भोपळे आहेत.

**निष्कर्ष :** (a) सर्व भोपळे शहामृग आहेत.
(b) काही उंदीर भोपळे आहेत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) किंवा (b) पैकी एकावेळी एकच सत्य (2) (a) किंवा (b) एकही सत्य नाही.
(3) फक्त (a) सत्य (4) फक्त (b) सत्य

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

**95.** किंमत काढा –

$\sqrt{100000} = ?$

(1) 260 (2) 284 (3) 300 (4) 316

---

**96.** $\frac{2}{5}$ पट म्हणजे किती टक्के ?

(1) 50 (2) 60 (3) 80 (4) 40

---

**97.** साधारणपणे दहाच्या सुमारास तुम्ही दक्षिण दिशेने चालत आहात. तुमच्या दिशेने येणाऱ्या अजोडची सावली तुम्हाला निश्चितपणे –

(1) त्याच्या उजवीकडे दिसेल (2) त्याच्या डावीकडे दिसेल

(3) त्याच्या डावीकडे किंवा उजवीकडे दिसेल (4) सांगता येणार नाही

---


**98.** जर चालताना आपल्याला आपली लांब सावली आपल्यासमोर दिसत असत असेल, तर निश्चितपणे –

(1) सूर्य पूर्व क्षितिजावर आलेला आहे. (2) सूर्य मावळायला थोडा अवकाश आहे.

(3) सूर्य क्षितिजाच्या बराच वर आहे. (4) वरीलपैकी एकही पूर्ण सत्य नाही.

---

**99.** खालील आलेखात महाबळेश्वर येथे पडलेल्या सन 2013 व 2014 या वर्षातील पाऊस दाखवलेला आहे. या आलेखावरून सन 2014 व सन 2013 मधील चार महिन्यांचा सरासरी पावसाचे गुणोत्तर किती येईल ?





(1) 6 : 7 (2) 7 : 6 (3) 5 : 6 (4) 5 : 7

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

100. खालील आकृतीत ठोकळ्याच्या दोन स्थिती दाखविलेल्या आहेत त्यानुसार जर दोन हा अंक ठोकळ्याच्या तळाशी असेल तर ठोकळ्याच्या वरच्या बाजूस कोणता अंक असेल?




(1) 1 (2) 2 (3) 3 (4) 4

-o0o-

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

P.T.O.

Teachingninja.in

**सूचना — ( पृष्ठ 1 वरून पुढे.... )**

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षा कक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

**प्रश्न क्र. 201.** आधुनिक विचारसरणीनुसार शिक्षणाच्या प्रक्रियेतील केंद्रबिंदू कोण ?

(1) शिक्षण संस्था (2) शिक्षक

(3) विद्यार्थी (4) अभ्यासक्रम

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) विद्यार्थी" हे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. 201 समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र. क्र. 201. ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

SEAL

Teachingninja.in